# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३०–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. रामू निंगाप्पा बालगाव,<br>मु. पो. उटगी, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. रामू निंगाप्पा बालगाव, मु. पो. उटगी, ता. जत, जि. सांगली यांनी रु. ४०००/– इतकी रक्कम अनामत म्हणून दि. २७.११.२००९ रोजी शेतीपंपाच्या वीज जोडणीसाठी भरलेली आहे. तथापि तक्रारदार यांस वीज जोडणी न मिळाल्यामुळे ३०.११.२००९ रोजी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष यांचेकडे तक्रार दाखल करुन विहीत मुदतीत कक्षाने आदेश पारित न केल्याने ११.२.२०१० रोजी मंचात तक्रार दाखल केली. मंचाने तक्रार दाखल करुन घेवून वि.प.कडून दि. २२.२.२०१० च्या पत्राने मुद्देनिहाय अभिप्राय मागविला.

दि. २३.३.२०१० रोजी ठेवलेली सुनावणी वि.प.स गैंरसोयीचे असल्याने वि.प.च्या विनंतीनुसार ६.४.२०१० रोजी सुनावणी ठेवली. ग्राहकाच्या प्रतिनिधीस तसे कळवून प्रतिनिधीसही ६.४.२०१० रोजी उपस्थित राहण्याबद्दल कळविण्यात आले. वि.प.ने इतकी मुदत देवूनही दि. ६.४.२०१० पर्यंत मुद्देनिहाय अभिप्राय अथवा लेखी म्हणणे वा आवश्यक ती कागदपत्रे दाखल केलेली नाहीत ही बाब मुद्दाम नमूद केलेली आहे.

माहे ऑक्टोबर ते नोव्हेंबर या काळात मा. अध्यक्ष व ग्राहक सदस्य यांची पदें रिक्त असल्याने व तक्रार होण्याचे प्रमाण जास्त असल्याने सुनावणी नंतरही निर्णयास विलंब झाला आहे.

अंतर्गत कक्षाचा निर्णय, ग्राहकाची तक्रार, वि.प.चे म्हणणे, सुनावणी दरम्यानची कथने या सगळ्यांचा एकत्रित विचार करुन मंच खालील निष्कर्षाप्रत पोहोचला आहे.

श्री. रामू निंगाप्पा बालगाव यांनी रु. २५०० + १५०० असे रु. ४०००/- २७.११.२००९ रोजी आपल्या शेतात शेतीपंपासाठी नवीन वीज जोडणी मिळावी म्हणून वि.प.कडे अनामत स्वरुपात जमा केलेली आहे असे आपल्या तक्रारीत नमूद केले आहे. त्यास वि.प.ने लेखी दुजोरा दिला आहे. अनामत रक्कम भरल्यानंतर मीटर पेटी वा इतर बाबी बसवून कागदपत्रें तसेच चाचणी अहवाल देणे ही ग्राहकाची जबाबदारी आहे. तसा चाचणी अहवाल ग्राहकाने दि. ८.३.२०१० रोजी दिल्याचे वि.प.ने नमूद करुन ३ पोलचे लघुदाब वाहिनीचे काम असल्याचे सुनावणीच्या दरम्यान नमूद केले आहे. दि. ८.३.२०१० रोजी चाचणी अहवाल मिळाल्यामुळे विहीत मुदतीत म्हणजे ३ महिन्यानंतर दि. ७.६.२०१० पर्यंत कनेक्शन देत असल्याचे स्पष्ट केले आहे. ग्राहकाने आपल्या तक्रार मागणी अर्जात एस.ओ.पी. विनियमानुसार जोडणी देण्याचा आदेश मिळावा अन्यथा विलंबाबद्दल ग्राहक भरपाई मिळावी अशी मागणी नोंदविलेली आहे. विलंब होत नसल्याने भरपाई देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. त्या मागणीस अनुसरुन कागदपत्रांची पूर्तता झाल्याच्या तारखेनंतर ३ महिन्यांचे कालावधीचे आंत म्हणजे दि. ७.६.२०१० पर्यंत वीज जोडून द्यावी असे मंच आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१) दि. ७.६.२०१० चे आंत सदर तक्रारदार ग्राहकास वीज जोडणी देणेत यावी.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

५)

दिनांक : ( जी. सी. लेले )
सदस्य

श्री. बी. जी. पवार, अध्यक्ष :

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :